oceanic consultants
www.OceanicConsultants.com
studying overseas is easier with us

Sakal
Date: 20-July, 2010

# 'ड्रीम स्टार्ट २०११' मोहिमेला सुरुवात

चुनाभट्टी (बातमीदार) : भारतातील आघाडीच्या ओव्हरसीज शिक्षण कन्सल्टन्सीपैकी एक असलेल्या ओशिॲनिक कन्सल्टंटने ३० आंतरराष्ट्रीय संस्थांसमवेत युती करून 'ड्रीम स्टार्ट २०११' ही राष्ट्रव्यापी मोहीम सुरू केली आहे. या कार्यक्रमांतर्गत भारतातील ३५हून अधिक विद्यार्थ्यांना यात सहभागी झालेल्या संस्थेमध्ये कोणत्याही प्रकारची फी न भरता शिकण्याची संधी मिळेल. या कार्यक्रमामुळे अंदाजे चार कोटी रुपयांची कोर्स फी माफ होणार आहे.

'ड्रीम स्टार्ट २०११' विषयी माहिती देताना ओशिॲनिक कन्सल्टंटचे सीईओ नरेश गुलाटी म्हणाले, 'ड्रीम स्टार्टमुळे विजेत्यांना एरवी परदेशी शिक्षणावर खर्च कराव्या लागणाऱ्या किमतीत लक्षणीयरीत्या बचत करण्याची संधी मिळणार आहे. बऱ्याच जणांसाठी ही जीवनभराची बचत ठरेल. ओशिॲनिकमध्ये आम्ही नेहमीच विद्यार्थ्यांना; तसेच समाजासाठी उत्कृष्ट सेवा देण्याचा प्रयत्न करतो. हा अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम असून यामध्ये ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि इंग्लंडमधील काही आघाडीच्या शिक्षण संस्थांनी हातमिळवणी केली असून पारितोषिकाच्या रूपात भारतीय विद्यार्थ्याला संपूर्ण अभ्यासक्रमाची फी माफ करण्यात येईल. आम्हाला खात्री आहे, की भारतीय विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा चांगला लाभ होईल. ओशिॲनिकच्या वतीने विद्यार्थ्यांना ही सेवा मोफत देण्यात येत आहे. ड्रीम स्टार्ट २०११ मध्ये सहभागी होण्याकरिता कोणत्याही प्रकारचे पैसे भरण्याची गरज नाही.'

यात सहभागी विद्यापीठांची यादी; तसेच फीमध्ये सवलत मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाची प्रक्रिया आणि इतर माहितीकरिता www.dreamstart.oceanicconsultants.com या संकेतस्थळाला भेट द्यावी.